दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २२६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१६ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## प्रसोल केमिकल्स कारखान्यात वायूगळती ; कामगाराचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । महाड**

**महाड एमआयडीसीमधील प्रसोल केमिकल्स या कारखान्यात वायूगळती होवून एका कामगाराचा मृत्यु झाला. तर दोघांना विषारी वायूची बाधा झाली.**




जितेंद्र भागूराम आडे (वय ३८, रा. वाळण बुद्रूक, ता. महाड) असे या घटनेत मरण पावलेल्या कामगाराचे नाव आहे. या घटनेत मिलिंद मोरे आणि प्रशांत केंकले या अन्य दोन कामगारांनाही या वायूची बाधा झाल्याने ते बेशुध्द पडले. त्यांना महाड येथील एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी मिलिंद मोरे याच्यावर उपचार सुरू आहेत. तर प्रशांत केंकले याला उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच, वाळण बुद्रुक आणि परिसरातील गावांतील नागरिकांचा मोठा जमाव रात्री कारखान्याबाहेर जमला होता. काही संतप्त नागरिकांनी कारखान्याच्या प्रवेशद्वारावर मोडतोडही केली. मृत कामगाराच्या वारसांना नुकसान भरपाई मिळण्याबरोबरच हा कारखाना कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी या ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. त्यामुळे कारखान्यात प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागला.

दरम्यान, आज सकाळी महाडचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी मृताचे नातेवाईक, ग्रामस्थ आणि कारखान्याचे अधिकारी यांची एक बैठक घेतली. मृताच्या वारसांना पंचवीस लाख रूपयांची मदत देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

या कारखान्यात अशा प्रकारची वायू गळती होण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

त्याचा त्रास या कारखान्याच्या परिसरात असलेल्या गावांनाही सहन करावा लागत असल्यामुळे हा कारखाना कायमस्वरूपी बंद करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## बहुमत असूनही शिंदे-फडणवीस सरकार अस्थिर-अस्वस्थ : खा.सुनील तटकरे



**रत्नागिरी । वृत्तसंस्था**

राज्यातील सरकारची अस्थिरतेकडे वाटचाल सुरु आहे. बहुमत असूनही हे सरकार अस्थिर आणि अस्वस्थ आहे. ज्यावेळी अस्थिरतेकडे वाटचाल होते, त्यावेळी पुढचे पाऊल हे मध्यावधी निवडणुका असू शकते. महाराष्ट्राच्या स्थापने-पासूनच पहिल्यांदाच एवढी अस्थिरता पाहायला मिळते आहे, असे मत खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत मांडले.

दिशा समितीच्या बैठकीसाठी खासदार सुनील तटकरे आज, मंगळवारी (दि.१५) रत्नागिरीत आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, आमदार जितेंद्र आव्हाड हे गेली अनेक वर्षे सक्रिय राजकारणात आहेत. शरद पवारांच्या पुरोगामी विचारांचा पगडा त्यांच्या मनावर आहे. पोलिसांमार्फत जो काही प्रकार झाला तो दुर्दैवी आणि निषेधार्ह असाच आहे. विरोधी पक्षा-तील सक्षम नेत्यावर अशाप्रकारची कारवाई करणे म्हणजे सरकारच्या अस्थिरतेबाबत त्यांच्याच मनात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. म्हणूनच अशाप्रकरची आकसाची कारवाई करण्यात आल्याचा आरोप खासदार तटकरे यांनी केला. सरकारने याबाबत फेरविचार करावा, असेही ते म्हणाले.

### मंत्री सत्तारांवर यापेक्षा कडक कारवाई झाली पाहिजे

राजकारणात आणि समाजकारणात मतमतांतर असू शकतात. प्रत्येकाची राजकीय विचारसरणी भिन्न असू शकते. संविधानाच्या माध्यमातून विरोधी पक्ष सक्षम असलाच पाहिजे. सत्तेचा अमरपट्टा घेऊन कोणीही आलेला नाही. आपले विचार मांडण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे. ज्यापद्धतीने गुन्हा नोंदविण्याची तत्परता दाखविण्यात आली. त्याउलट खासदार सुप्रिया सुळे यांच्याबद्दल अत्यंत अश्लिल, हीन शब्दामध्ये राज्याच्या एका विद्यमान मंत्र्याने काढलेले उद्गार महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारे आहे. खरंतर कारवाई व्हायचीच असेल तर यापेक्षाही कडक कारवाई अब्दुल सत्तार यांच्यावर झाली पाहिजे, असे खासदार तटकरे म्हणाले.

## पतीकडून पत्नीची हत्या; सागवाडी बेलोशीतील घटना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यातील सागवाडी,बेलोशी येथे पतीने पत्नीचा चाकूचे वार करुन खून करण्याची घटना घडली आहे. सागवाडी बेलोशी येथील परेश जानू शिद यांच्या घरातील हॉलमध्ये त्याची बहीण रेणुका रमाकांत मेंगाळ, वय २१, रा.भोमोली या ही झोपली होती.

मध्यरात्री २ च्या सुमारास तिचा पती रमाकांत चाया मेंगाळ हा घराच्या मागील बाजूकडील उघड्या दरवाजातून हॉलमध्ये आला आणि त्याने झोपलेल्या रेणुकाच्या शरीरावर चाकूने वार करुन तिला ठार मारले. याबाबतची फिर्याद परेश शिद याने रेवदंडा पोलिसात दिली आहे. हत्येचे नेमके कारण समजले नाही. पोलिसानी तातडीने आरोपीला अटक केली आहे. त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. या हत्येमुळे परिसरात खळबळ माजली आहे. घटनास्थळी रेवदंड्याचे पोलीस निरीक्षक मुपडे यांनी भेट दिली. अधिक तपास सुरु आहे.

## मुस्लिम बांधवांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणाली वर प्रेरित होऊन तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली खारघर शहरातील मोहम्मद हसमैन, रश्मीकांत के पटेल, बैयतुल्ला सिद्धीकी, गुलाम हुसेन, अक्रम खान, संदीप यादव यांच्या सह त्यांच्या कार्यकर्त्यानी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांनी पक्षप्रवेश करणाऱ्या मुस्लिम बांधवांना शिवबंधन बांधून पक्षात स्वागत केले. या पक्षप्रवेशावेळी महानगर समन्वयक दिपक घरत, शहर प्रमुख गुरुनाथ पाटील, उपशहर प्रमुख गुरूनाथ म्हात्रे, उपशहर संघटक शंकर सोनूले, विभाग प्रमुख अनिल तळवणेकर, सचिन ठाकूर, जरियाब शेख, विभाग समन्वयक संजय कानडे, शाखाप्रमुख संतोष शिंदे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हायस्पीड डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कराची प्रतिपूर्ती करण्याचा मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा निर्णय

### आ.महेश बालदी यांची मागणी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि. ३१.०३.२००८ च्या शासन निर्णयामध्ये योग्य ती सुधारणा करून मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या ६ सिलेंडरच्या १२० अश्वशक्ती व त्यावरील यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कराची प्रतिपुर्ती करणेबाबत निर्णय करण्यात आल्याची माहिती राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. या निर्णयाचा हजारो मत्स्यव्यवसायिकांना लाभ होणार असून या संदर्भात आमदार महेश बालदी यांची मागणी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे.



१२० अश्वशक्ति वरील इंजिन क्षमता असणाऱ्या नौकांना डिझेल कोटा व प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबतच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत उरण विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांनी विनंती केली होती. त्या अनुषंगाने आता मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि. ३१.०३.२००८ च्या शासन निर्णयामध्ये योग्य ती सुधारणा करून मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या ६ सिलेंडरच्या १२० अश्वशक्ती व त्यावरील यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कराची प्रतिपुर्ती करणेबाबत निर्णय करण्यात आला आहे. या सुधारणा दि. ३१/०३/२००८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आलेल्या असून या संदर्भातील पत्र राज्याचे मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आमदार महेश बालदी यांना दिले असून सोबत मत्स्यव्यवसाय विभागाचे दिनांक १४ नोव्हेंबर २०२२ चे शुद्धिपत्रकही देण्यात आले आहे. यावेळी मोरा सोसायटीचे माजी चेअरमन जयविंद्र कोळी, सुर्यकांत (बबलू) कोळी आदी उपस्थित होते. मच्छिमारांच्या हितासंदर्भात घेतलेल्या या निर्णयाबद्दल मच्छीमार संघटनांनी मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार महेश बालदी यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## सौंदर्यीकरण आणि स्वच्छतेच्या माध्यमातून मुंबई अधिक सुंदर करणार : ना.दिपक केसरकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई शहरात सौंदर्यीकरण, स्वच्छता, इमारती आणि रस्त्यांवरील विद्युत प्रदीपन, कोळीवाड्यांचा विकास आदी माध्यमातून मुंबईचे अधिक सुंदर रूप जगासमोर आणणार असल्याचे मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा पालकमंत्री श्री. केसरकर यांनी मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त डॉ.इक्बाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी



भिडे, सर्वश्री आशिष शर्मा, डॉ.संजीव कुमार, पी.वेलरासू, जिल्हा नियोजन अधिकारी श्री.सुपेकर, महापालिकेच्या संबंधित शाखांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. केसरकर यांनी महानगरपालिकेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला. सुरू असलेल्या कामांना गती देऊन ते कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहरात सौंदर्यीकरण आणि नियमित स्वच्छतेव्यतिरिक्त व्यापक स्वच्छता कामांचा एकत्रित शुभारंभ येत्या १५ दिवसांत करावा, कोळीवाड्यांच्या विकासासाठी सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक आयोजित करून अडचणी तातडीने दूर कराव्यात, रोजगार आणि स्वयंरोजगार या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची

…/२

## पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी नेत्यांनी कसली कंबर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या निवडणुक बिलगुल वाजल्यापासून महाविकास आघाडी च्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबन दादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आघाडीचे नेते आमदार बाळाराम पाटील, पंचायत समिती सभापती काशिनाथ पाटील जे. एम. म्हात्रे, आर. सी घरत, हेमराज म्हात्रे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांच्यासह अनेक आघाडीचे नेते मंडळींनी कंबर कसून पनवेल परिसरातील सर्व मतदारांशी संवाद साधून आघाडीच्या उमेदवारांना



मतदान करण्याचे आवाहन केले यावेळी बबन दादा पाटील यांनी आघाडीचे तेरा उमेदवारांना बॅट च्या चिन्हावर शिक्का मारून निवडून देण्याचे आवाहन केले.

पनवेल ग्रामीण भागातील विविध ठिकाणी गावकऱ्यांनी आघाडीच्या नेत्यांचे स्वागत करून आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याची ग्वाही दिली. आघाडीचे उमेदवार पुढील प्रमाणे अनिल जनार्दन केणी, राजेश लक्ष्मण खानावकर डॉक्टर हितेन बिहारीलाल शहा, दिलीप शंकर कदम, बळीराम परशुराम म्हात्रे, ज्ञानेश्वर धोंडू बडे, प्रवीण पोपटराव जाधव, जनार्दन पांडुरंग पाटील,

…/२

## महापालिका मुख्यालयात क्रांतीवीर बिरसा मुंडा जयंती निमित्ताने अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आदिवासी समाजाचे आद्य प्रवर्तक क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, करवसुली विभागप्रमुख हरिश्चंद्र कडू, सामान्य् प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी ,घनकचरा आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व कर्मचारी उपस्थित होते.

## जितेंद्र आव्हाड यांना अटकपूर्व जामीन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांना ठाणे कोर्टाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आज त्यांनी दाखल केलेल्या विनयभंगाच्या आरोपांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली. दोन्ही बाजूकडील युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर ठाण्याचे सत्र न्यायाधीश प्रणय गुप्ता यांनी निर्णय दिला.



आव्हाड यांच्या विरो-धात राजकिय वैमनस्यातून भाजपच्या पदाधिकारी महिलेने विनयभंगाचा गुन्हा दाखल केला असून यात स्पर्श करण्यामागे तसा कोणताही कथित आरोपी तथा आपले अशील आव्हाड यांचा हेतू नव्हता. मुख्यमंत्री यांच्या

…/२

## एमआयडीसची सांडपाणी वाहिनी शिरगांवनजिक फुटली

### सीईटीपीविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपीमधील सांडपाणी वाहून नेणारी जलवाहिनी सोमवारी रात्री शिरगांव गावानजिक फुटल्याने शिरगांव ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. जोपर्यंत सीईटीपीविरोधात गुन्हा दाखल केला जात नाही, तोपर्यंत या ठिकाणी दुरूस्तीचे कोणतेही काम करू देण्यात येणार नाही, अशी भूमिका घेत या ग्रामस्थांनी आज औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार्यांना परत पाठविले. ग्रामस्थ एवढ्यावरच थांबले नाहीत, तर उद्या (बुधवारी) या मागणीसाठी शिरगांव येथे तीव्र आंदोलन छेडण्याचाही निर्णय या ग्रामस्थांनी घेतला आहे.

महाड औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपीमधून प्रक्रिया केलेले सांडपाणी या जलवाहिनीद्वारे औद्योगिक विकास महामंडळ खाडीपट्टा विभागातील नदीपात्रात सोडत असते. सोमवारी रात्री आठ साडेआाठ वाजण्याच्या सुमारास, शिरगाव गावालगतच्या डोंगरात ही सांडपाणी वाहिनी फुटली. आणि सर्व पाणी रस्त्यावर येवू लागले. या पाण्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांना डोकेदुखी, श्वास घेण्यास त्रास होवू लागला. ही वाहिनी फुटल्यानंतरही दोन ते अडीच तास औद्योगिक विकास महामंडळाचा एकही अधिकारी घटनास्थळी

…/२

# हवामान बदलाचे राजकारण

हवामान बदलाचे संभाव्य दुष्परिणाम रोखण्यासाठीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रगत आणि विकसनशील देश असे दोन गट समोरासमोर उभे ठाकतात हा आजवरचा अनुभव. इजिप्तमधील शर्म-ए-शेख येथे सध्या सुरू असलेली परिषद (सीओपी २७) याला अपवाद नाही. कार्बन आदी प्रदूषणकारी वायूंचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात करीत आलेले श्रीमंत देश याबाबतची आपली जबाबदारी ओळखून पावले उचलत नसतील, तर त्यांना त्याचे स्मरण करून देणे ही विकसनशील देशांचे कर्तव्यच म्हणावे लागेल. याच मुद्द्यावरून हवामान परिषदेत विकसनशील प्रगत देशांना कोंडीत पकडत आले आहेत. यंदा शर्म-ए-शेखमध्येही हेच घडत आहे. प्रदूषणातील आपल्या ऐतिहासिक वाट्याकडे पाठ न फिरविता प्रगत देशांनी उपाययोजनांत आणि विकसनशील देशांसाठीच्या निधीत योग्य वाटा उचलावा, अशी भूमिका भारताच्या नेतृत्वाखाली विकसनशील देश घेत आहेत. प्रगत देश मात्र भारत, चीन यांसारख्या विकसनशील देशांकडे अंगुलिनिर्देश करीत आहेत. कार्बन उत्सर्जनात सर्वाधिक वाटा असलेल्या पहिल्या वीस देशांनी उपाययोजना आणि उद्दिष्टे निश्चित करावीत, असा आग्रह ते धरत आहेत. भारत आणि चीन यांचा विकास सध्या वेगाने होत असून, त्यांची ऊर्जेची मागणी अधिक आहे. त्यामुळे त्यांच्याकडून होणारे उत्सर्जनही अधिक आहे. कार्बन डाय ऑक्साइड उत्सर्जनात सध्या चीन पहिल्या स्थानी असून, जगभरातून होणाऱ्या एकूण उत्सर्जनात त्याचा वाटा ३२ टक्के आहे. भारताचा वाटा सात टक्के आहे; आणि तो चौथ्या स्थानी आहे. चौदा टक्के वाटा असलेली अमेरिका दुसऱ्या स्थानी, तर युरोपीय संघ तिसऱ्या स्थानी (आठ टक्के वाटा) आहे. सध्याची ही आकडेवारी नमूद करीत प्रगत देश प्रदूषणाच्या बाबतीत भारत आणि चीनला आपल्या बरोबर घेत आहेत. त्यांची ही कृती अयोग्य असल्याची भूमिका भारत नेहमी घत आला असून, इतिहासाचा दाखला देत आताही त्याने हाच मुद्दा नमूद केला आहे. गेल्या वर्षीच्या प्रदूषणाच्या आकडेवारीनुसार, चीनकडून सर्वाधिक म्हणजे ११.५ अब्ज टन उत्सर्जन केले गेले. अमेरिकेकडून पाच अब्ज टन, युरोपीय संघाकडून २.६ अब्ज टन आणि भारताकडून २.७ अब्ज टन उत्सर्जन झाले. उत्सर्जनात भारत पहिल्या चार देशांत आहे हे खरे; मात्र जगातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे सतरा टक्के लोक या देशात राहतात. त्यामुळे उत्सर्जनातील भारतातील दरडोई प्रमाण प्रगत देशांपेक्षा तर खूप कमी आहे आणि जागतिक सरासरीच्याही एक तृतीयांश आहे. अमेरिकेत एका व्यक्तीकडून दरवर्षी होणारे उत्सर्जन १४.९ टन आहे; रशियात ते १२.१ टन, जपानमध्ये ८.६ टन, युरोपीय संघातील देशांत ६.३ टन आहे. चीनमध्येही दरडोई वार्षिक उत्सर्जन आठ टनांवर गेले आहे. भारतात मात्र ते केवळ १.९ टन आहे. गेल्या अडीचशे वर्षांतील उत्सर्जनाचा एकत्रित विचार केल्यानंतर प्रगत देशांनी केलेल्या प्रदूषणाची तीव्रता स्पष्ट होते. त्यानुसार आजवरच्या एकूण प्रदूषणात अमेरिकेचा वाटा २५ टक्के आणि युरोपीय संघातील देशांचा वाटा १८ टक्के आहे. प्रदूषणात आघाडीवर असलेले हे देश उपायांच्या बाबतीत मात्र पिछाडीवर आहेत. वास्तविक उत्सर्जन कमी करण्यासाठी त्यांनी अधिक प्रयत्न करण्याची, त्यासाठी हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची आणि या तंत्रज्ञानासह अन्य उपायांसाठी विकसनशील देशांना निधी देण्याची गरज आहे. याला संमती दर्शवूनही कार्यवाही होताना दिसत नाही. सध्या सुरू असलेल्या परिषदेत भारताने हा मुद्दाही अधोरेखित केला आहे. कोपेनहेगन येथे २००९मध्ये झालेल्या परिषदेत (सीओपी १५) विकसनशील देशांना प्रतिवर्षी शंभर अब्ज डॉलरचा निधी देण्याचे प्रगत देशांनी कबूल केले होते. मात्र, हा निधी पूर्णपणे उभारण्यात त्यांना साफ अपयश आले आहे. प्रदूषण रोखण्याच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जे उपाय योजायचे आहेत, त्यांच्या अंमलबजावणीकरिता विकसनशील देशांना २०३०पर्यंत सहा लाख कोटी ते अकरा लाख कोटी डॉलर लागतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हा हवामान निधी न मिळाल्यास उपायांची अंमलबजावणी करण्यात विकसनशील देश अपयशी ठरतील हे वास्तव भारताने अधोरेखित केले आहे. प्रदूषणकारी वायूंच्या उत्सर्जनामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे आणि त्यामुळे हवामानात बदल होतो आहे, या वास्तवाकडे कोणाचेच दुर्लक्ष होऊन चालणार नाही. हवामान बदलाबाबत आपल्याकडील काही शास्त्रज्ञांचे वेगळे मत असले, तरी उन्हाळ्यात ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे तापमान जाणे, पावसाळा लांबणे आणि अतिवृष्टीचे प्रमाण वाढणे, पुराच्या घटना वाढणे आदी गोष्टी सातत्याने घडत आहेत. अतिवृष्टीमुळे अन्नधान्याची कशी टंचाई निर्माण होते हे पाकिस्तानातील पुराने दाखवून दिले आहे. हवामान परिषदेत प्रगत देशांबाबत भारताची भूमिका रास्त असली, तरी प्रदूषण रोखण्यासाठी देशांतर्गत पातळीवर कठोर उपाय करावेच लागतील.

# रायगडात शिक्षकेतर कर्मचारी दिन उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

राज्यातील विद्यालयांचा प्रशासनातील डोलारा व प्रशासकीय कामकाज सांभाळणारे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग हा विद्यालय प्रशासनाचा कणा मानला जातो.

मात्र हाच कर्मचारी शासनाच्या विविध सुविधांपासून वंचित राहिला आहे . शिक्षकेतरांच्या प्रतिनिधींनी १५ नोव्हेंबर १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ स्थापन केले. त्या दिवसापासून राज्यांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव १५ नोव्हेंबर या दिनी केला जातो .रायगड जिल्ह्यामधील शेकडो शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन शिक्षकेतर कर्मचारी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

०१ मे रोजी कामगार दीन म्हणून गौरव होत असतो, मात्र राज्यातील लाखो शाळांमध्ये शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र शाळा प्रशासन सांभाळणारे शाळेचा कणा मानला जाणारे शिक्षकेतर कर्मचारी महत्व कोणत्याही गौरव वंचित राहिला आहे. शिक्षकेतर कर्मचारी संघटना श्रमिक संघ अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असल्या तरी शिक्षकेतरांचा कामगार संज्ञेत समावेश होत नाही, येथेही शिक्षकेतर परत लांबच ठेवला जात आहे.

यावर विचार करता शिक्षकेतरांचे राज्यस्तरावरील नेते, आभ्यासक, व विचारवंत श्री.सतीश नाडगौडा यांनी मांडलेला विचार सर्वसंमत झालेला आहे. शिक्षकेतरांच्या धुरिणांनी १५ नोव्हेंबर १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ स्थापन केले. त्यानंतर वेळोवेळीच्या संघर्ष, आंदोलनांमुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन्शन, केंद्राप्रमाणे वेतन/ वेतनश्रेणी/भत्ते, चिपळूणकर समिती शिफारशी, तसेच सेवा विषयक सर्व लाभ मिळवून दिलेले आहेत.अन् ते मिळतच रा-हणार आहेत .मात्र ते कायम राहण्यासाठी राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकसंधतेची गरज आहे .याकरिता १५ नोव्हेंबर हा शिक्षकेतर दिन दिन म्हणून राज्यभर शाळांतून साजरा करण्याचे ठरवले गेले. त्यानुसार रायगड जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महामंडळाचे सचिव मिलिंद बाळकृष्ण जोशी यांच्या सूचनेप्रमाणे रायगड जिल्ह्यातील शेकडो शाळातून शिक्षकेतर कर्मचारी दोन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे मुख्याध्यापक व शिक्षकांकडून पेन ,पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या शिक्षकेतर कर्मचारी महामंडळाला रायगड जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी जोस्तना पवार शिंदे यांनीही लेखी स्वरूपात हार्दिक शुभेच्छा देऊन गौरविले आहे. विविध शाळांमधून निवृत्त झालेले ही वरिष्ठ लेखनिकांचाही त्या विद्यालयात सन्मानपूर्वक बोलावून सत्कारही करण्यात आला.तसेच अनेक लोकप्रतिनिधी खासदार आमदार यांनीही शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दूरध्वनी वरून त्यांचे अभिनंदन करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. अनेक वर्षानंतर प्रथमच शिक्षकेतर कर्मचारीतील हा राज्यात उत्साह पूर्ण वातावरणात साजरा होत असल्याने व्हाट्सअप सोशल मीडिया वर हार्दिक शुभेच्छांचा जणू काही पाऊसच पडत आहे.

# उरण विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉँग्रेस, कॉँग्रेस आणि शिवसेनेचे प्रमुख कार्यकर्ते भाजपात

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉँग्रेस, कॉँग्रेस आणि शिवसेनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते त्यांना पक्षाची शाल देऊन भाजपात प्रवेश देण्यात आला.

उरण तालुका राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे कैलास भोईर, चाणजे ग्रामपंचायतीच्या सदस्या किंजल कैलास भोईर, माजी आमदार मनोहर भोईर यांचे कट्टर समर्थक जनार्दन रामचंद्र म्हात्रे तसेच त्यांचे मित्र मंडळ यांनी शिवसेनेतून त्याचबरोबर भाताण गावातील कॉँग्रेसचे अनंत सते, मारुती म्हात्रे यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक बबन मुकादम, चंद्रकांत घरत, पंडित घरत, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विजय भोईर, प्रसाद भोईर, राजू भोईर, हेमंत भोईर, चाणजे ग्रामपंचायत सदस्य प्रीतम पाटील, सागर वाघमारे, फराज शेख, सोमनाथ आटपाटकर, अजय म्हात्रे, भाताण ग्रामपंचायत सदस्य तानाजी पाटील, युवा कार्यकर्ते अनिल भोईर, सुमित मुकादम आदी उपस्थित होते.

# पनवेल तालुका सहकारी भातगिरणीत १५०० शेतकरी बांधवानी केली नोंदणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रायगड बाजारच्या समोर पनवेल तालुका सहकारी भातगिरणी येथे पनवेल तालुक्यातील शेतकरी बांधव तयार झा-लेले भात पिक देण्याकरता कार्यालयात येवून ऑनलाइन नोंदणी करत आहेत. आता पर्यंत १५०० शेतकरी आहे. बांधवानी नोंदणी केली असुन भात उत्पादक शेतकऱ्यांची एकूण संख्या १७०० आहे. मागील वर्षीच्या भात खरेदी दरात १०० रूपये वाढ करुन शासन भात खरेदी करणार असल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

विकास प्रकल्पांच्या निमीत्ताने शेतजमीन क्षेत्र कमी होत असल्याची ओरड एकीकडे असता पारंपरिक भात उत्पादक शेतकरी आपल्या उपलब्ध भातशेती क्षेत्रातून चांगल्या पैकी भात पिक घेत असल्याचे या निमीत्ताने स्पष्ट झाले आहे.

पनवेल तालुक्यांप्रमाणेच रायगड जिल्ह्यातील उर्वरित सर्व तालुक्यांत देखील भात खरेदी नोंदणी करणा शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी सुरु केली असून आतापर्यंत सुमारे सहा हजार शेतकऱ्यांनी जिल्ह्यात नोंदणी केली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# मुख्यमंत्रीजी हेलिकॉप्टरने नको निदान चारचाकीने आमच्या महामार्गाची पण पहाणी करा ! जनतेची मागणी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



मुंबईहून ओझर्डेकडे हेलिकॉप्टरने येताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसींग लिंक प्रकल्पाच्या कामाची हवाई पाहणी देखील केली. याची चित्रफीत नुकतेच जिल्हा माहिती कार्यालय रायगड कडुन फेसबुकवर प्रसिध्द करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आता सर्वसामान्य कोकण व रायगडवासियांची विनंती आहे कि आमच्या रायगड मधिल रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे पहाण्यासाठी हेलिकॉप्टरने नको पण निदान आपल्या चारचाकी वहानातुन येथे येऊन पाहणी करावी. आपल्या लक्षात येईल, काय भिषण अवस्था झाली आहे.

या मार्गावरुन आपल्या कामधंद्यानिमीत्त प्रवास करणाऱ्या सर्वसामान्यांचे काय हाल होत आहेत. या रस्त्यासाठी आता केवळ तीव्र आंदोलनच करणे, हीच आता काळाची गरज बनली असल्याचे जनता बोलत आहे. इतकच बोलुन लोक थांबत नाहीत, प्रचंड संतापाने लोक म्हणतात या रस्त्याचे संबंधित जबाबदार अधिकारी फक्त मलई खाण्यात बिझी आहेत. त्यांना सामान्य जनतेची काहीच पडलेली नाही. गेले १२ वर्षात अनेक वेळा दुरुस्ती झाली पण रस्ता काही सुसज्ज बनला नाही. राष्ट्रीय महामार्ग ६६ वरून जनेतेने असा जीवघेणा प्रवास अजून किती वर्ष करावा ? याबाबत एकदाच काय तो निर्णय करावा म्हणजे आंदोलन करण्याच्या भानगडीत कोणीही पडणार नाही.

नुकतेच ९ नोव्हेंबरला रायगड व कोकणच्या पत्रकारांनी कोलाड येथे मानवी साखळी आंदोलन करीत शासनाचे लक्ष वेधले. उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी ची मागणी करीत एक महिन्यात महामार्ग दुरुस्तीसाठी अंतिम इशारा देखिल दिला आहे. पुन्हा ये रे माझ्या मागल्या ! असे न करता, काय तो एकदाच निर्णय घ्यावा. बंदोबस्तासाठी पोलीस, शासकिय यंत्रणा, निष्पाप प्रवासी जनतेला हा त्रास का दिला जात आहे ! याचे आश्चर्य व्यक्त होत लोकप्रतिनीधीं व शासन व्यवस्थेवरील या प्रदिर्घ दिरंगाई, दुर्लक्षतेने विश्वासहार्यतेला तडा गेला आहे. सबका साथ सबका विकास यालाच म्हणतात का? अस उपहासाने बोलल जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सौंदर्यीकरण आणि स्वच्छतेच्या माध्यमातून मुंबई अधिक सुंदर करणार

अंमलबजावणी तातडीने करावी, कोळीवाड्यांसह शहरातील विविध पर्यटनस्थळांवर पर्यटकांसाठी अधिक सुविधा निर्माण कराव्यात, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

मुंबईकरांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी लहान लहान फिरती तपासणी केंद्रे उभारण्यात येणार आहेत, याचाच एक भाग म्हणून लवकरच ५० चाचणी केंद्रे सुरू करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

मुंबई शहरात रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत सविस्तर आढावा घेऊन पालकमंत्री श्री.केसरकर यांनी महिलांसाठी खास स्वयंरोजगाराचे पर्याय उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

यामध्ये साधनांची विविध पर्याय देण्याची सूचना त्यांनी केली. मंदिरे आणि पर्यटनस्थळांवर पार्किंग सुविधेसह इतर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, शिक्षण क्षेत्रात मुंबईचा लौकिक वाढेल यासाठी आणखी प्रयत्न करावेत, उंच इमारतींमधील आग लागण्याच्या घटना टाळण्यासाठी मुख्य अग्निशमन अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांची बैठक घेऊन उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

मुंबईतील पर्यटक आकर्षणाचे केंद्र असलेल्या काळाघोडा, बाणगंगा, कोळीवाडे आदी ठिकाणी पर्यटन महोत्सवाच्या धर्तीवर नियमित कार्यक्रम आयोजित करावेत. दक्षिण मुंबईतील इमारती, शिवाजी पार्क, वरळी परिसरातील रस्ते आणि इमारती आदी ठिकाणी कायमस्वरूपी विद्युत रोषणाई करावी, अशा सूचनाही मंत्री श्री.केसरकर यांनी यावेळी दिल्या.

## महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी नेत्यांनी कसली कंबर

विद्या भास्कर चव्हाण, विमल मल्लिनाथ गायकवाड, बाबुराव हरिभाऊ पालकर, अरविंद महादेव सावळेकर, पांडुरंग बंडू भागीवंत. या उमेदवारांना बॅट या चिन्हावरती शिक्का मारून निवडून देण्याचे आवाहन आघाडी करून करण्यात आले.

## जितेंद्र आव्हाड यांना अटकपूर्व जामीन

कार्यक्रमात गर्दी झाल्यामुळे ती बाजूला करताना त्यांनी बाजूला सरण्यास सांगताना तिला हात लागला, असे सांगत आव्हाड यांचे वकील गजानन चव्हाण यांनी घटनास्थळी असलेला व्हिडिओ देखिल न्यायालयात सादर केला.

हा विनयभंगाचा गुन्हा होउ शकत नसल्याचा युक्तिवाद केला. त्यावर सरकारी वकील वर्षा चंदने यांनी मात्र जमिनीला आक्षेप घेत फिर्यादी महिलेने हा प्रकार घडल्यानंतर तातडीने मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे सांगून यात राजकीय दबाव नसल्याचे स्पष्ट केले.

शिवाय, वर्तकनगर च्या गुन्ह्यात १२ नोव्हेंबर रोजी दिलेल्या जमिनाच्या अटींमध्ये पुन्हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा न करण्याची अटही, त्यांनी मोडली. जो व्हिडिओ सादर केला, त्यातही तिला स्पर्श केल्याचे स्पष्ट दिसते. आरोपी स्वतः आमदार असल्यामुळे तपासात दबाव आणण्याचीही शक्यता आहे. या दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्या. गुप्ता यांनी निर्णय दिला.

## एमआयडीसची सांडपाणी वाहिनी शिरगांवनजिक फुटली

न आल्याने नागरिकांच्या संतापात भर पडली. ही सांडपाणी वाहिनी जरी औद्योगिक विकास महामंडळाची असली तरी त्यातून सोडण्यात येणारे पाणी सीईटीपीमधील असते. हे पाणी दूषित आणि नागरिकांच्या आरोग्याला घातक असल्याचा आरोप शिरगांव ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना शिरगांवचे सरपंच सोमनाथ ओझर्डे यांनी सीईटीपीवर गंभीर आरोप केले. औद्योगिक विकास महामंडळाने सीईटीपीविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करावा अशी आमची मागणी असल्याचे सोमनाथ ओझर्डे यांनी सांगितले.

या प्रकारानंतर आम्ही स्वस्थं बसणार नसून, जोपर्यंत एमआयडीसी असा गुन्हा दाखल करित नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहणार असल्याची भूमिका त्यांनी मांडली. याच आंदोलनाचा एक भाग म्हणून बुधवारी (१६ नोव्हेंबर) दुपारी तीन वाजता शिरगांव येथे या परिसरातील सर्व ग्रामस्थांना बरोबर घेवू आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या नागोठण्यातील मेळाव्यात विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस व रायगड रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे यांच्या आशिर्वादाने तसेच रायगडच्या माजी पालकमंत्री आ. आदितीताई तटकरे व विधानपरिषदेचे आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन संपूर्ण रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षातील इनकमिंग जोरात सुरु आहे. याचाच एक भाग म्हणून नागोठण्यात नुकत्याच संपन्न झालेल्या राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या मेळाव्यात रोहा पंचायत समितीचे माजी सभापती व पाटणसई ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक सदानंद गायकर, राष्ट्रवादीचे विभागीय नेते भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादीचे विभागीय कार्याध्यक्ष आणि पाटणसई ग्रामपंचायतीचे सदस्य सचिन कळसकर यांच्या नेतृत्वाखाली पाटणसई ग्रामपंचायत हद्दितील वासगाव येथील जानू कोंडू कोकरे, गंगाराम झिलू बावदाने धाऊ बारकु कोकरे, भगवान बारकू कोकरे, सुभाष जानू कोकरे, जयेश बारकू कोकरे आदिंनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.



वेताळवाडी येथील जय हनुमान क्रीडा मंडळातील कार्यकर्त्यांनीही केला राष्ट्रवादी पक्षात प्रवेश नागोठणे विभागातील श्रीमंत ग्रामपंचायत अशी ओळख असलेल्या ऐनघर ग्रामपंचायत हद्दितील वेताळवाडी येथील जय हनुमान क्रीडा मंडळातील कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादी युवकच्या या मेळाव्यात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व ऐनघर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अंबाजी शिद, राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे रोहा तालुका उपाध्यक्ष व ऐनघर विभागातील युवा नेते निवास पवार, कार्यकर्ते अशोक कापसे, संतोष झोलगे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला.

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये मालू शिद, धर्मा वारगुडे, काशिराम वारगुडे, अनिल वारगुडे, चंद्रकांत दरवडे, राजू वारगुडे, मंगेश हंबीर, महेश निरगुडे, जगदीश निरगुडे, खेलू भस्मा, अजय शिद, योगेश शिद, संजय शिद, राजेन शिद, संजय वारगुडे, प्रकाश शिद, वसंत निरगुडे, गजानन निरगुडे, भास्कर वारगुडे, विजय शिद, करन वारगुडे, विशाल वारगुडे, रमेश हंबीर, मनोज वारगुडे, जितेंद्र वारगुडे, सुभाष पिंगळा, सुधीर भस्मा, परशुराम वारगुडे, प्रितम शिंदे, रघुनाथ वारगुडे, खेळू शिद, अंबाजी वारगुडे आदिंचा समावेश आहे.

नागोठण्यातील राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या मेळाव्यात राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आ. अनिकेतभाई तटकरे यांनी पक्षात स्वागत केले व राष्ट्रवादी पक्षात सर्वांना मानसन्मानाची वागणूक मिळेल याची ग्वाही दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## दीपक सावंत देणार जगताप कुटुंबाला साथ

**दै.रायगड नगरी । महाड**

मावळत्या नगरपालिकेतल सेना नगरसेवक आणि माजी विरोधी पक्षनेते दीपक सावंत यांनी महाडचे माजी आमदार स्व.माणिकराव जगताप यांच्या कुटुंबाला राजकीय साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.

जगताप आणि सावंत कुटुंबियांचे अनेक वर्षांपासून स्नेहपूर्ण संबंध आहेत. स्व.माणिकराव जगताप यांनीच दीपक सावंत यांना नगरसेवक म्हणून काम करण्याची पहिली संधी दिली होती. नंतरच्या काळात दीपक सावंत यांनी राजकीय भूमिका बदलून शिवसेनेत प्रवेश केला. मात्र कौटुंबिक संबंधात कोणतीही कटुता आली नव्हती. आता माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांना शहरात केलेल्या विकास कामांनी प्रभावित होवून त्यांनी पुन्हा जगताप कुटुंबाला साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.

सोमवारी स्नेहल जगताप आणि जिल्हा काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष हनुमंत जगताप यांची भेट घेवून आपण यापुढे तुमची साथ देणार असल्याचे दीपक सावंत यांनी स्पष्ट केले. जगताप कुटुंब भविष्यात जो राजकीय निर्णय घेईल तो निर्णय आपल्याला मान्य असेल असे श्री.सावंत यांनी स्पष्ट केले. आज माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप आणि हनुमंत जगताप यांनी शिवाजी चौकातील अद्ययावत अशा सुलभ शौचालयाची पाहणी केली. त्यावेळेसही दीपक सावंत त्यांच्यासमवेत उपस्थित होते. आजपासूनच हे स्वच्छतागृह नागरिकांसाठी खुले करण्यात आले.

## खरसई आगरी समाज ग्रामस्थ मंडळ मुंबईने केला येशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक,क्रिडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत असलेली खरसई आगरी समाज ग्रामस्थ मंडळ रजि.मुंबई तर्फे नवी मुंबईतील नेरुळचे नगरसेवक गिरीश म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत शैक्षणिक क्षेत्रात दहावी, बारावी व पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा अतिशय थाटामाटात संपन्न झाला. सोहळ्यासाठी मंडळाचे अध्यक्ष हरिष पयेर, काशिनाथ शितकर, यशवंत शितकर, गिरीश पाटील, नामदेव शितकर, जतीन पयेर, प्रदीप खोत, भालचंद्र पयेर, काशिनाथ पयेर, संदिप म्हसकर, मुंबई मंडळ सल्लागार चंद्रकांत खोत, अध्यक्ष काशिनाथ पयेर, महादेव लेपकर, मनोज माळी, कृष्णा पयेर,चंदू मांदाडकर, पांडुरंग कांबळे आदी मान्यवर पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार सोहळ्यात प्रा.सचिन कांबळे सर आणि विराज मांदारे सर यांनी विद्यार्थ्यांना करियर निवडीसंदर्भात अमूल्य मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुलांचे लसीकरण वाढवा, स्वतंत्र ओपीडी सुरू करावी : ना.तानाजी सावंत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुलांचे लसीकरण वाढवा, मुलांसाठी स्वतंत्र ओपीडी सुरू करावी आणि सर्वेक्षण करुन संशयित लक्षणे असणाऱ्या मुलांवर लक्ष ठेवा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी मुंबई महानगर पालिका अधिकाऱ्यांना दिले.

मंत्री श्री. सावंत यांनी मुंबई महापालिकेमार्फत शहरातील काही भागात राबविण्यात येणाऱ्या गोवर प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक घेतली. त्या बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या.

बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. संजीव कुमार, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक आणि आयुक्त डॉ. तुकाराम मुंढे, महापालिकेच्या आरोग्य



अधिकारी डॉ. मंगला गोमारे, जागतिक आरोग्य संघटनेचे तज्ज्ञ डॉ. राहुल शिंपी, राज्य साथरोग अधिकारी डॉ प्रदीप आवटे आदी उपस्थित होते.

डॉ. संजीव कुमार यांनी सांगितले की मुंबई शहरातील आठ वॉर्ड मध्ये मुलांना गोवरची लक्षणं आहेत.

या भागात पथकांमार्फत मुलांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. लक्षणे आढळल्यास मुलांना तत्काळ दवाखान्यात दाखल करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुमारे दहा हजार मुलांचे लसीकरण केले आहे. येत्या काही दिवसांत सुमारे ५० हजारांहून अधिक मुलांना लसीकरण करण्याचे नियोजन केले आहे.

यावर श्री. सावंत यांनी सांगितले की, संबंधित आठ वॉर्ड मध्ये विशेष पथकांच्याव्दारे सर्वेक्षण करावे. यासाठी आवश्यक असल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाचे मनुष्यबळ पुरवले जाईल. मुंबई बरोबरच गोवरची लक्षणे आढळलेल्या मालेगाव आणि भिवंडी निजामपूर महानगरपालिका परिसरातही सर्वेक्षण करावे. तेथेही लसीकरण वाढवावे. मुलांचे लसीकरण करण्यासाठी पालकांचे समुपदेशन करावे. समुपदेशन करण्यासाठी पथकांची नियुक्ती करण्यात यावी.

यावेळी डॉ. मंगला गोमारे यांनी मुंबई महापालिका राबवत असलेल्या प्रतिबंधक उपाययोजनांची माहिती दिली.

## नवीन पनवेल काँग्रेसतर्फे बाल दिन उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान स्वर्गीय पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जयंती आणि बाल दिनानिमित्त पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभिजीत दादा पाटील व पनवेल तालुका कॅाग्रेस अध्यक्ष नंदराज मुंगाजी, पनवेल जिल्हा युवक कॅाग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, पनवेल जिल्हा महिला कॅाग्रेस अध्यक्षा निर्मला म्हात्रे, माजी नगरसेविका शशिकला सिंग, शाळेचे प्राचार्य श्री विजय ठाकूर सर, सेवादल प्रदेश काँग्रेस पुजा मोहन, उत्तर भारतीय प्रदेश सरचिटणीस महेंद्रकुमार सिंग, पनवेल जिल्हा महिला काँग्रेस सरचिटणीस निता शेनॉय, पनवेल जिल्हा युवक कॅाग्रेस प्रवक्ते अरुण ठाकुर,पनवेल जिल्हा कॅाग्रेस उपाध्यक्ष सुधीर मोरे, म प्रदेश सचिव प्रितेश साहू, पनवेल जिल्हा युवक कॅाग्रेस उपाध्यक्ष अभिजित मुंडुकल, तळोजा फेज १ युवक कॅाग्रेस अध्यक्ष तेजस केणी, तलोजा फेज २ युवक कॅाग्रेस अध्यक्ष मोरेश्वर पाटील, कामोठे युवक कॅाग्रेस अध्यक्ष सुरज नरुटे, पनवेल शहर युवक कॅाग्रेस अध्यक्ष राकेश जाधव, शाहीद मुल्ला यांच्या हस्ते ६०० विद्यार्थांना पेन पेन्सिल खोड रबर शार्पनर कीट व चॅाकलेट वाटप समारंभ आज दि १४ नोव्हेंबर २०२२ रोजी श्री संत साईबाबा प्राथमिक शाळा नविन पनवेल येथे संपन्न झाले आहे. शाळेचे शिक्षक वृंद सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी होते. कार्यक्रमाचे आयोजन चेतन म्हात्रे (युवा नेते काँग्रेस ) व मर्फी म्हसकर (अध्यक्ष नवीन पनवेल शहर युवक कॅाग्रेस) यांनी केले.

## मुरुडच्या सर.एस.ए. हायस्कूलमध्ये बाल दिनानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण मराठी साहित्य परिषद, मुरुड जंजिरा शाखा व सर. एस. ए. हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने बाल दिनानिमित्ताने मुरुडच्या सर. एस. ए. हायस्कूलमध्ये पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.


सदर कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या मूर्तीला व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला कोमसाप शाखाध्यक्ष संजय गुंजाळ व मुख्याध्यापक सरोज राणे सर यांनी पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय गुंजाळ, अरुण बागडे, प्रतिभा जोशी, नैनिता कर्णिक, नयन कर्णिक,उषा खोत, डॉ. रवींद्र नामजोशी, उर्मिला नामजोशी, महेंद्र पाटील सर, वैशाली कासार, भास्कर मोरे सर, सिद्धेश लखमदे उपस्थित होते. वक्तृत्व स्पर्धा दोन गटात झाल्या. स्पर्धेत एकूण २३ विध्यार्थ्यांना सहभाग घेतला होता. पाचवी ते सातवी गटात प्रथम क्रमांक कु. आर्या जितेंद्र म्हामुणकर, द्वितीय क्रमांक कु. तन्वी शैलेश मसाल, तृतीय क्रमांक कु. देवयानी दीपक पाटील यांनी पारितोषिके पटकावली व आठवी ते दहावी गटात प्रथम क्रमांक कु.राधिका प्रशांत विरकूड , द्वितीय क्रमांक कु.सृष्टी संजय भगत, तृतीय क्रमांक कु.उर्वशी दिनेश पोवळेकर यांनी पारितोषिके पटकावली. स्पर्धेनंतर माजी विध्यार्थी कवी सिद्धेश लखमदे यांनी त्यांच्या दोन कविता सादर केल्या व उपस्थितांची दाद मिळवली. संजय गुंजाळ यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी अभिनय तसेच वक्तृत्व क्षेत्रात ज्यांना आवड आहे त्यांना नक्की संधी देणार असल्याचे सांगितले. तसेच प्रभावी वक्तृत्व करण्यासाठी एक कार्यशाळा घेणार असल्याचे सांगितले. स्पर्धेचे परीक्षण प्रज्ञा सदरे व स्नेहा गद्रे यांनी केले. तसेच सूत्रसंचालन अमिता विरकूड यांनी केले. नैनिता कर्णिक यांनी आभार मानले.



## चिरनेरच्या नागरी वस्तीत आढळला ११ फुट लांब, ४९ किलो वजनाचा अजगर

**दै.रायगड नगरी । उरण**

तालुक्यातील चिरनेर येथील अंकुर क्लिनिकच्या जवळ सोमवारी (१४) संध्याकाळच्या सुमारास भला मोठा अजगर आढळून आला. भक्ष्यासाठी झुडपात लपून बसलेल्या ११ फुटी आणि ४९ किलो वजनाच्या भल्या मोठ्या पायथॉन जातीच्या अजगराला सुरक्षितरित्या बाहेर काढून सर्पमित्रांनी त्याला वनकर्मचाऱ्यांच्या मदतीने बाबुजी देव जंगलात सुखरूप सोडून दिले.



हा भला मोठा अजगर शेजारीच राहणाऱ्या प्रवीण म्हात्रे यांच्या दृष्टीस पडला. याची माहिती त्यांनी सर्पमित्र राजेश पाटील याला दिली. राजेश पाटील यांनी आपले सहकारी हिंमत केणी, विवेक उटली, ऋषीकेश पाटील यांच्यासह झुडूपाची पाहणी केली. या झुडपात भक्ष्यासाठी दबा धरून बसलेला ११ फुट लांबीचा आणि ४९ किलो वजनाच्या भला मोठा अजगर आढळून आला. या अजगराला सर्पमित्रांनी मोठ्या शिताफीने पकडले आणि वनअधिकाऱ्यांच्या मदतीने बाबुजी देव डोंगरात वनक्षेत्रात नेऊन त्याला सुरक्षित ठिकाणी सोडून दिले असल्याची माहिती सर्पमित्र राजेश पाटील यांनी दिली.

## श्रमिक विद्यालय चिल्हे येथे बालदिन मोठ्या उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे बालदिन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

या कार्यक्रमातंर्गत सर्वप्रथम मुख्याध्यापक दिपक जगताप यांच्या हस्ते स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी येथील शिक्षक नरेंद्र माळी, राजेश म्हात्रे, शिवनाथ दराडे, संजय आंधळे, महेंद्र जवरत, अमोगसिद्ध सुरवसे, सुनील थिटे, अमित डाके, पांडुरंग शिद, अनुराधा मोरे, ज्योत्स्ना सबरदंडे आदी उपस्थित होते.

बालदिनाचे औचित्य साधून विद्यार्थी वर्गाने पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जीवन व कार्य याबाबत माहिती सांगून त्यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला.

## म्हसळ्यात नगरी संरक्षण आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे तहसीलदार घारे यांच्या हस्ते उदघाटन



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जिल्हा आपती व्यवस्थापन, नागरी संरक्षण रायगड यांच्या विद्यमाने घनसार कोप्लेक्स म्हसळा येथील सभागृहात म्हसळा तालुका नागरी संरक्षण आपती व्यवस्थापन १५ नोव्हेंबर २०२२ ते १९ नोव्हेंबर २०२२ पाच दिवशीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. तहसीलदार समीर घारे यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे, गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड,डॉ. मुबशीर जमादार, ऍड. के. डी. पाटिल, सउनी के. आर. कुरकुटे, सउनी शशिकांत शिरसाट, तुफेल दामाद, विलास पाटिल, समीर थळे, डावरे, रविंद्र दळवी, किशोर मोहिते, इम्तियाज दामाद, अभय कलमकर आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन, नागरिकांची सुरक्षा आणि त्या साठी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे, गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी तहसीलदार समीर घारे यांनी सांगितले आपत्ती बाबत सर्वांनी दक्ष रहाणे अत्यावश्यक असून त्याबाबत काळजी घेणे हे प्रत्येक नागरिकांचें कर्तव्य आहे. भारत महासत्ताक देशाकडे वाटचाल करीत असून प्रत्येकाने स्वतः सह देशाच्या संरक्षणात सहभागी होणे गरजेचे असून शासनाच्या योजना काटेकोर अंमलात आणल्या पाहिजेत. नैसर्गिक आपत्ती हि अतिवृष्टी मुळे होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत यासाठी प्रशासनाने शासनाच्या विविध जोजना यशस्वीपणे राबविणे गरजेचे असल्याचेही तहसीलदार घारे यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | | ३०/२ | ०-९४-४० पो.ख. ०-०२-८० एकूण क्षेत्र ०-९७-२० | ८.७८ |
| | पैकी राजेंद्र जवानमल गांधी यांचे मालकी क्षेत्र | | ०-२२-५० पो.ख.०-०२-८० एकूण क्षेत्र ०-२५-२५ | २.१० |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१५/११/२०२२

सही/-
**ॲड.महेश भगत**
**शॉप नं.२२, कल्पतरु कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.५१, सेक्टर नं.९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल-पश्चिम, ता.पनवेल, जि.रायगड**
**मोबा नं.८६५५१५८७८१**



Hon'ble Sonawane Sir Court
Adv.Shamim Ahsan

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF THE CIVIL JUDGE (S.D.)
PANVEL, AT PANVEL
Misc Application NO. 1085/2022
Exh : 11/D
N.D.15/12/2022

1) Miss.Harmoni Muthu Selvan
2) Miss.Zioni Muthu Selvan
No.1 & 2 since minor through
their mother, natural guardian.
next friend Lata Muthu Selvan
All R/at-Room No.9, Dongre Chawl,
Kismat Colony, Kausa, Mumbra,
Thane 400612 Applicants

The applicants father Muthu Selvan died intestate on 25/01/2022 at Tamil Nadu, The deceased had left the following property to be inherited by her legal heirs :

ALL THAT Premises being a residential premises bearing **Flat No.412, admeasuring area 205 Sq.ft. situate on 4th floor of the building known as BHAGAT PARK standing on land bearing Survey No.125, Hissa No.2, lying being and situate at Village Adai, Taluka Panvel, District Raigad, for the total and lumpsum consideration of a sum of Rs.8,50,000/-**

Whereas the above named applicants have filed Misc. Application for Heirship Certificate under Chapter 1 & 2 of Bombay Regulations VIII of 1827, the court of Civil Judge (S.D.) Panvel.

The general public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D.) Panvel, in person or by pleader duly instructed and to file your Say / Objection if any within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice. Failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hand & seal of the court this 14 of 11/2022

Sd/- Jr.Clerk Civil Court Panvel | Court Seal | Sd/- Asst.Suprident. Civil Court Panvel



### सावधानतेची नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल / वादी श्री.यशवंत आप्पा उर्फ आबा भोपी, तसेच श्री.वासुदेव आप्पा उर्फ आबा भोपी व इतर ४, रा.मु.रिटघर, पो.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी सौ.कमलाबाई शालिक पाटील व इतर १४ यांचेविरुद्ध पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात रेग्युलर दिवाणी दावा क्र.२८०/२०२१ दाखल केलेला आहे. सदर जमीन मिळकतींबाबतचा दावा हा हक्क प्रस्थापनेकरिता, ठरावाकरिता, वाटपाकरिता व निरंतर स्वरुपाच्या मनाई हुकूमाकरिता तसेच ताबा-कब्जा कायम करून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर दावा मिळकतींचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**दावा मिळकतींचे वर्णन**

| ठिकाण | सर्व्हे नं. (गट क्रं. व उपविभाग) | क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मौजे : रिटघर, ता.पनवेल, जि.रायगड | १७२ | जि. ०-५१-०० पो.ख. ०-१४-८० एकूण ०-६५-८० | ९.६२ |
| मौजे : रिटघर, ता.पनवेल, जि.रायगड | ८ | जि. ०-५८-६० पो.ख. ०-०५-६० एकूण ०-६४-२० | १०.२३ |

**दावा मिळकतीचे वर्णन**

| ठिकाण | सर्व्हे नं. (गट क्रं. व उपविभाग) | क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड | ५२/८ | जि. ०-६८-७० पो.ख. ०-०२-४० एकूण ०-७१-१० | १४.१२ |

मौजे : रिटघर व मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेल्या मिळकती ह्या वादी व प्रतिवादी यांच्या पुर्वजांपासून वादी यांच्या हिश्श्यास तोंडी वाटपाने आलेल्या मिळकती असल्याने सदर जमीन मिळकतीबाबतचा वाद हा मे.न्यायालयात न्यायनिर्णयाकरिता न्यायप्रविष्ठ आहे. तसेच मौजे : रिटघर येथील सर्व्हे नं.१५७, क्षेत्र जि.०-६०-५०, पो.ख.०-०२-००, एकूण ०-६२-५० या मिळकतीत वादींचा सामाईक हिस्सा असतानाही प्रतिवादींनी परस्पर विक्री केलेली असल्याने वादी यांना त्यांचा हिस्सा मिळणेकरिता दावा केलेला आहे.

तरीही तमाम जनतेस या सावधानतेच्या नोटीसीने कळविण्यात येत आहे की, सदर वर नमूद मिळकतींबाबत कसल्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार करू नये, तसेच कोणत्याही प्रकारचा दस्त नोंदणीकृत करू नये. सदर मिळकतीबाबत पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.२८०/२०२१ हा दावा वर नमूद जमीन मिळकतींबाबत प्रलंबित असल्याचे लक्षात घ्यावे / असावे व सदर जमीन मिळकतींबाबत कोणताही, कसलाही व्यवहार करू नये, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१५/११/२०२२

**वादीतर्फे वकील**
**ॲड.शांताराम चांगदेव बेडेकर**
**शॉप नं.६२, पहिला मजला, बिल्डींग नं.३, पनवेल म्युन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८६९२९४४८३३/७०४५७७०२७२**

# संक्षिप्त...

## कोकण विभागीय लोकशाही दिनी 03 अर्ज निकाली

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ०३ असून आज आलेल्या अर्जांची संख्या ०५ असे एकूण प्राप्त अर्ज ०८ होते. त्यापैकी ०३ अर्ज निकाली काढण्यात आले. सध्या ०५ तक्रारी प्रलंबित आहेत.

## लोक अदालत दरम्यान पनवेल शहर पोलीस ठाण्याने पटकावले सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्त अंतर्गत परिमंडळ २ मध्ये लोक अदालत दरम्यान सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी पटकावले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत असणारे समन्स व वॉरंट विभागाचे अंमलदार पोलीस हवालदार युवराज येळे, पोलीस हवालदार रजनीकांत पगारे, पोलीस नाईक नितीन कुंभार, पोलीस नाईक नंदकुमार आढारी यांनी आतापर्यंत विविध गुन्ह्या संदर्भात बजावलेल्या समन्स व वारंट यातून केलेल्या कामाचे कौतुक वरिष्ठ पातळीपर्यंत करण्यात आले आहे.

या कर्मचाऱ्यांचा नुकताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी सन्मान चिन्ह देऊन गौरव केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# रोटरी क्लबच्या माध्यमातून नागोठण्यात सुसज्ज रुग्णालय उभारणार : सचिन मोदी

## नागोठणे रोटरी सॅटेलाइट क्लबचा पदग्रहण समारंभ : भाजपा युवा नेते परेश ठाकूर व वैकुंठशेठ पाटील यांची उपस्थिती

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे विभागात विविध समस्या असुन या समस्या रोटरी सॅटेलाइट क्लबच्या माध्यमातुन सोडविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीन. रोटरी सॅटेलाईट क्लब ची स्थापना झाल्या नंतर आम्ही वासगाव या आदिवासी वडीवरील शाळेस कॉम्पुटर संच भेट देऊन चांगली सुरवात केली आहे. यापूर्वी देखील आम्ही रोटरी क्लबच्या माध्यमातून महाड चिपळूण येथील पूरग्रस्तांना चांगल्या प्रकारे मदत केली असुन पूरग्रस्त भागात गाळ काढण्यासाठी आम्ही ४० लाख रुपयांचे पंप देखील दिलेले आहेत.




रोटरी क्लब म्हणजे समाजसेवेचा क्लब आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. रोटरी क्लब सर्व क्षेत्रात उल्लेखनीय काम करत आहेत. नागोठणे भागातील सर्वात मोठी समस्या म्हणजे येथे सुसज्ज असे रुग्णालय नाही. एखाद्याला काही मोठा आजार झाला तर त्या रुग्णास पुढील उपचारासाठी पनवेल मुंबई किंवा पुणे याशिवाय पर्यायच नाही. या ठिकाणी पोहचेपर्यंत संबंधित रुग्ण दगावण्याची अधिक शक्यता असते म्हणून लवकरच रोटरी क्लबच्या माध्यमातून नागोठणे येथे सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याचा माझा मानस असुन तीच खरी समाजसेवा ठरेल असे मत भाजपा नागोठणे शहर अध्यक्ष तथा नागोठणे रोटरी सॅटेलाइट क्लबचे अध्यक्ष सचिन मोदी यांनी सांगितले.

गुरुवार दि. १० नोव्हेंबर रोजी नागोठणे येथील कामथ गोविंद हॉटेल येथे नागोठणे रोटरी सॅटेलाइट क्लबची स्थापना व पदग्रहण समारंभाचे आयोजन केले होते त्यावेळी सचिन मोदी बोलत आहेत.

यावेळी भाजपा युवा नेते वैकुंठशेठ पाटील, परेश ठाकुर व रोटरी क्लबच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत अध्यक्षपदी सचिन मोदी, सचिवपदी गौतम जैन, खजिनदारपदी नीलेश सोलंकी, उपाध्यक्षपदी श्रेया कुंटे तसेच सदस्यपदी डॉ. गंगाधर कोकणे, डॉ.सुनील पाटील, डॉ.रोहिदास शेळके, डॉ.राजेंद्र धात्रक, डॉ.अभिषेक शहासने, सुरेश जैन, विजय मुल्कवाड, निलिमा राजे, प्रियांका पिंपळे, निवृत्ती मांडलूस्कर, प्रशांत गोळे, श्वेता परांजपे, मांगीलाल चौधरी व धिरज मोदी यांची नियुक्ती करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांचे परेश ठाकूर व वैकुंठशेठ पाटील यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

भाजपाचे युवा नेते सचिन मोदी यांच्या माध्यमातून नागोठणे विभागातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या निश्चितच सोडविल्या जातील असा विश्वास भाजपा युवा नेते परेश ठाकूर व वैकुंठशेठ पाटील यांनी व्यक्त केला. दरम्यान यावर्षी रोटरी क्लबच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविणार असून पुढील महिन्यात माझ्या मान्यवर सहकाऱ्यांच्या मदतीने व रोटरी क्लबच्या माध्यमातून रोहा येथे इंटर नॅशनल मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करणार असल्याची माहिती नवनिर्वाचित अध्यक्ष सचिन मोदी यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पेझारी येथील माधुरी म्हात्रे यांनी केले तर उपस्थितांचे आभार गौतम जैन यांनी मानले.

## कर्जत नगरपरिषदमध्ये बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



**दै.रायगड नगरी । कर्जत**

बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंडमधील उलिहातू या गावी १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण जर्मन मिशननरी स्कूल मध्ये झाले. सगळ्यांमध्ये मिळून- मिसळून राहण्याचा बिरसाचा स्वभाव होता. त्यामुळे तरुण वयात त्यांनी समवयस्क आणि समविचारी सहकार्यांचे संघटन केले.

बिरसांना आपल्या वडिलांचे सुगन मुंडांचे जबरदस्तीने धर्मांतरण केल्याबद्दल ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व इंग्रजांचा मनस्वी राग येत असे. त्यातच अशिक्षित आदिवासींवर इंग्रजांकडून होणारा अत्याचार पाहून इंग्रज अधिकाऱ्यांना धडा शिकवण्याचा विचार त्यांनी केला. बिरसा मुंडांनी गोडगेडा गावातील स्वामी आनंद पांडे यांना गुरुस्थानी मानले होते. त्यांच्या आशीर्वादाने आणि त्यांच्या सहकार्याच्या बळावर इंग्रज सरकारच्या अन्यायाविरोधात बिरसा मुंडाने छोटा नागपूर क्षेत्रात इ.स १८९५ साली लढा उभारला.

इंग्रजांनी त्याला अटक केली व तुरुंगात अतोनात छळ केला. ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांचा रांची कारागृहात मृत्यू झाला. बिरसा मुंडा यांना लोकांनी जननायक हा किताब बहाल केला होता. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी रविंद्र लाड, बापू बहिरम, अविनाश पवार, दयानंद गावंड, हरिश्चंद्र वाघमारे, हृदयनाथ गायकवाड, निलेश देशमुख, कल्याणी लोखंडे, विभावरी म्हामूणकर,दिलीप लाड, बाळा निकाळजे,शेखर लोहकरे, रुपेश पाटील, महेंद्र पवार, सुदेश गायकवाड, सामिया चौगुले, मुकेश परदेशी, जयवंत उघडा, महेश दाभणे आदी सह नगरपरिषद कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## गणपती मंदिर जवळील प्रलंबित चेम्बरच्या प्रश्नावरून शिवसेना लाक्षणिक उपोषण करणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीतील सेक्टर-१८ गणपती मंदिर जवळ गणेश सोसायटी जवळ चेम्बर ६ महिने आधी आतून निकामी असून यासंदर्भात सिडको कार्यालयाला तक्रार देऊनही दुर्लक्ष होत असल्याने येथे मोठा दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. तरी सिडकोने या नागरी समस्येकडे लक्ष घालावे अन्यथा प्रश्नावरून लाक्षणीक उपोषण करण्याचा इशारा शिवसेनेतर्फे देण्यात आला आहे.



शिवसेना शहर कामोठे शहरप्रमुख राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उपशहर प्रमुख कामोठे शहर सचिन त्रिमुखे यांनी सिडको कामोठे विभाग कार्यकारी अभियंता श्री. पांडुळे यांना यासंदर्भातील निवेदन दिले. यावेळी शिवसेना उप शहर प्रमुख संजय मालजी, प्रभाग क्र -११ उप विभाग प्रमुख चंद्रशेखर बनसोडे, शिवसेना शाखा प्रमुख सेक्टर -३४ संतोष कचरे, शिवसेना सेक्टर -१८ शाखा प्रमुख बबन खणसे आणि सेक्टर -३४ गटप्रमुख बुद्धिमान जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सचिन त्रिमुखे यांनी सांगितले कि, कामोठे विभागातील सेक्टर-१८ गणपती मंदिर जवळ गणेश सोसायटी जवळ चेम्बर ६ महिने पासून आतून निकामी झाला आहे. कामोठे सिडको ऑफिसला तक्रार दिल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे मुळे हा रास्ता पूर्ण पणे खचला आहे त्यामुळे येणारे जाणारे वाहन त्या अडकून राहत आहेत त्यामुळे लवकरात लवकर काम सिमेंटचे कॉंक्रेट करून रोड दुरुस्ती पूर्ण करावे अन्यथा सेक्टर-१८ गणपती मंदिर जवळ बुधवार १७ नोव्हेंबर रोजी एक दिवस लक्षणीय उपोषण आणि आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

## म्हसळा तालुक्यातील तेरा ग्रामपंचायतींचा धुरळा उडणार ; ऐन थंडीत राजकीय वातावरण तापणार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील तेरा ग्रामपंचायत निवडणुंकाचा बिगूल वाजला असून आगामी जिल्हा परिषद, तसेच पंचायत समितीच्या निवडणुकांमुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका मोठ्या चुरशीच्या होणार असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे. डिसेंबरमध्ये मुदत संपणार्या या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. १८ डिसेंबरला मतदान होणार आहे, तर २० रोजी मतमोजणी होईल.

या ग्रामपंचायती मध्ये खरसई, संदेरी, तोंडसुरे, कांदळवाडा, तोराडी, घोणसे, काळसुरी, देवघर, फळसप, लेप, कणघर, निगडी, रेवळी या सारख्या म्हसळा तालुक्यातील राजकीयदृष्टया महत्त्वाच्या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. यामुळे म्हसळा तालुक्याचे राजकारण ढवळून निघणार आहे. आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जण ग्रामपंचायत निवडणुकीकडे बारीक लक्ष देणार आहे. प्रत्येक पक्ष व आपल्या गटातील गावे आपल्या ताब्यात राहण्यासाठी सर्वच नेत्यांकडून प्रयत्न करण्यात येणार यात शंका नाही. त्यामुळे तालुक्यातील सर्वच गावांच्या निवडणुका चुरशीच्या होणार आहेत.

राजकारणात ग्रामपंचायत ही पहिली पायरी समजली जाते. ग्रामीण राजकारणाच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या व गावपातळीवर पकड मजबूत करण्यासाठी गाव पुढार्यासह तालुक्यातील लोकप्रतिनिधीकडूनही या निवडणुकांकडे गांभीर्याने पाहिले जाते. भर थंडीत ग्रामपंचायत निवडणुकांच्या बरसा-तीने ग्रामीण भागातील राजकारण भिजून निघणार आहे.

तेरा ग्रामपंचायतीचे सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमात सरपंचपदाची निवड थेट मतदारांमधून होणार असल्यामुळे निवडणूकीत मोठा उत्साह निर्माण झाला आहे. ग्रामपंचायत निहाय सरपंचपदासाठी आरक्षण निश्चित असल्यामुळे निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांकडून ग्रामपंचायत क्षेत्रात निवडणूक व्यूहरचनेची जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. पाच वर्षांपूर्वी झालेल्या या तेरा ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रवादीकडे आठ, शिवसेनेकडे दोन, शेकापकडे एक तर एका ग्रामपंचायतमध्ये अपक्ष असे पक्षीय बलाबल होते. सध्याच्या राजकारणाची परिस्थिती बघता तालुक्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व दिसून येते. उद्धव ठाकरेंची शिवसेना, भाजप, काँग्रेस, बाळासाहेबांची शिवसेना, शेकाप हे सुद्धा या निवडणुकीत मोठ्या ताकतीने उतरणार आहेत. त्यामुळे ऐन थंडीत राजकीय वातावरण तापणार हे नक्की.

## आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून भवानीमाता मंदिर सामाजिक सभागृहासाठी १० लाख रू.निधीचे पत्र

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील जय भवानीमाता मंदिर गावठण या मंदिराचे सामाजिक सभागृह बांधकामासाठी आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून १०; रू.लाख रुपये निधीचे पत्र देण्यात आले आहे.



यावेळी पं.स.वरसे गण अध्यक्ष अनंत देशमुख, विभागातील युवा कार्यकर्ते महेश तुपकर,सरपंच निलेश जंगम, दत्ता सानप, शैलेश कदम, शेखर कदम, निकेश कदम, स्वप्निल कांदलेकर, तुषार मालुसरे, भावेश कदम, कैलास कदम, प्रथमेश भोकटे, शरद कदम, प्रभाकर दळवी, भास्कर सानप, निखिल कदम, सुराज कदम, समीर कांदलेकर व अन्य युवक उपस्थित होते. खेड्यापाड्यात विकासाची गंगा आणून ग्रामीण भागाचे चौफेर विकासाचे स्वप्नं बाळगणारे खा.सुनील तटकरे, आ.आदिती तटकरे यांच्या माध्यमातून दमदार आमदार अनिकेत तटकरे यांनी गावठण गावातील युवकांच्या सामाजिक सभागृहाचे मागणीला लगेच होकार देत हा नधी देण्यात आला आहे.

तर तालुक्यातील धामणसई विभागात सत्तेच्या माध्यमातून सतत विकासकामांना प्राधान्य देऊन विकासकामांसाठी झटणारे आमदार म्हणून आ.अनिकेत तटकरे यांनी तरूणाईवर एक वेगळी छाप टाकली असून आज या विभागातील तरूण त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहत असल्याचे युवा कार्यकर्ते महेश तुपकर यांनी याबाबत पत्रकारांना माहिती देताना सांगितले. तर मंदिर सभागृहाचे बांधकामासाठी आ.अनिकेत तटकरे यांनी महत्वपुर्ण सहकार्य केल्याने गावठाण येथील शिवमुद्रा मित्र मंडळ व ग्रामस्थ कडून आभार व्यक्त आहे.

# पोलादपूर एस.टी.स्थानकापेक्षा अधिक प्रवासी वाहतूक

## खासगी प्रवासी वाहतूक होतेय पश्चिमेच्या सर्व्हिस रोडवर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वर पोलादपूर एस.टी.बस स्थानक रायगड जिल्ह्यातील शेवटचे मोक्याचे बसस्थानक म्हणून सर्वपरिचित होते. मात्र, आता मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ झाल्यानंतर पोलादपूर शहरातील राष्ट्रीय महामार्ग अंडरपास जाण्यास सुरूवात झाल्यानंतर या एस.टी.बसस्थानकाचे महत्व काहीसे कमी झाले असून पोलादपूर तालुक्यातील प्रवाशांना एस.टी.गाड्यांऐवजी खासगी लक्झरी बसने प्रवास करण्याची अपरिहार्यता निर्माण झाली आहे. सध्या पोलादपूरच्या पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवरून मोठ्या संख्येने खासगी प्रवासी वाहतूक सुरू झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रायगड जिल्ह्यातील शेवटचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे बसस्थानक पोलादपूर येथे असून याठिकाणाहून रत्नागिरी, सातारा आणि मुंबईच्या दिशेने एस.टी.गाड्यांतून प्रवासी वाहतूक होत असते. गेल्या काही वर्षांपासून स्थानकाच्या १०० मीटर परिसरातून खासगी लक्झरी बसेसद्वारे तालुक्यातील प्रवाशांची दररोज वाहतूक सुरू झाली आहे. यादरम्यान, कोणत्याही प्रवाशाकडून विनातिकिट प्रवासापोटी अव्वाच्यासव्वा रक्कम घेऊन असुरक्षित प्रव-ासी वाहतूक करताना पोलादपूर एस.टी. स्थानकातील मुंबई, पुणे, सातारा व महाबळेश्वर मार्गावरील प्रवासी फेऱ्या कशा कमी होतील, याकडे अर्थपूर्ण लक्ष दिलेले दिसून येत आहे.

पूर्वी पोलादपूर एस.टी.स्थानकाबाहेर तीनचाकी आणि चारचाकी खासगी वाहनांतून अवैध प्रवासी वाहतूक सुरू असताना आता मोठ्या आसनक्षमतेच्या सेमी लक्झरी आणि लक्झरी गाड्यांची संख्या लक्षणीय दिसून येत आहे. प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने या खासगीरित्या चालणाऱ्या अवैध व्यवसायासाठी मुतारी व अन्य सुविधा संबंधित व्यावसायिक देत नसून अनेकांकडे अपघातानंतर भरपाई व मोबदला देण्यासंदर्भात विम्याची पॉलिसीदेखील नसल्याचे उघडपणे चर्चेत आले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी या सर्व प्रकाराकडे दूर्लक्ष करीत या वाहनांची चलती कायम ठेवण्यासाठी अर्थपूर्ण गिनती करीत असून यापैकी काही वाहनचालकांचे नातेवाईक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे कर्मचारी असल्याचे देखील उघड झाले आहे. महाड एस.टी.आगारातून रात्रीच्या वस्तीच्या गाड्यांमध्ये डिझेल भरून या खासगी वाहनांमध्ये इंधनाची सोय करण्याची अजब तरतूदही या नातेवाईक कर्मचाऱ्यांनी केल्याची आकसापोटी चर्चा उघड झाली आहे. पूर्वी पोलादपूर स्थानकाबाहेर पश्चिमेला उभ्या राहणाऱ्या खासगी वाहनांनी आता पोलादपूर पंचायत समितीप-ासून समृध्दी अपार्टमेंट पर्यंत पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवर प्रवासी वाहतूक करण्यासाठी आपआपली ठिकाणे निश्चित केल्याचे दिसून येत आहे. या वाहतुकीला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अभय मिळाले असून उपप्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडूनही या खासगी प्रवासी वाहतुकीचे लागेबांधे जोपासण्यास सहकार्य केल्याने या वाहनांतून प्रवास करणारे प्रवासी किती सुरक्षित आहेत, याबाबत कोणतीही चर्चा घडून येत नाही.

पोलादपूर एस.टी.स्थानकामध्ये चिंपाट आंदोलनासारखे विषय हाताळणाऱ्यांना या विषयांवरही लक्ष घालण्याचे आवाहन पोलादपूर तालुक्यातील जनता करीत असून पोलादपूर तालुकावासियांचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी राजकीय पुढारी व लोकप्रतिनिधींमधील अनास्थाही कमालीची असल्याचे दिसून येत आहे.

## उरणची भू संपादन समस्या सोडविण्यासाठी बाळाराम पाटील यांना शेतकऱ्यांनी दिले निवेदन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील नागाव, केगाव, चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व जमिनी सिडकोने ताब्यात घेण्यासाठी नोटिफिकेशन वर्तमान पत्रात प्रसिद्ध केल्यानंतर नागाव, केगाव, चाणजे या तिन्ही ग्रामपंचायत शेतकऱ्यांनी निषेध करुन आपल्या जमीनी न देण्याचा निर्धार केला.

शासनाचा लक्ष वेधून घेण्यासाठी विधान परिषदेत लक्षवेधी मांडून आवाज उठविण्यासाठी आमदार बाळाराम पाटील यांना निवेदन देऊन सदर समस्या सोडविण्याची मागणी केली. यावेळी तिन्ही ग्रामपंचायतीचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. गजानन म्हात्रे, भालचंद्र (भाई) म्हात्रे, मधुसूदन म्हात्रे, कॉ. म्हात्रे, लक्ष्मीकांत पाटील, सुनील पाटील, ॲड.प्रदीप पाटील, शरद कडू, काका पाटील, माया पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.